Impact Factor : 1.4152 (UIF)
Volume - 3 | Issue - 2 | October – 2016

नामवंत भारतीय संगीतकारांचा इतिहास

प्रा.संजय पत्की
संगित विभाग उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

प्रस्तावना:-

दिग्गजांनी निर्माण केलेल्या या सौंदर्यतत्वामुळे भारतीय संगीतकला समृद्ध झाली. त्यांनी त्या काळातील अनेक अडचणींचा सामना करीत व अनंत हालअपेष्टा सहन करीत संगीतकलेला प्रवाही ठेवले याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे महत्त्वाचे ठरेल.

१) पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर (१८४९ - १९२६)(ग्वाल्हेर घराणे)

मिरजेजवळील बेडग नावाच्यागावत इत्यादीस. १८४९ मध्ये यांचा जन्म झाला. त्यांच्या घरामध्ये वेदविद्या शिकवली जात असे. वडील रामचंद्रपंतांनी त्यांनी ही विद्या शिकण्यासाठी खूप मनधरणी केली पण त्यांचे मनात संगीत शिकण्याचे नक्की झाले होते. तेव्हा वडीलांना बाळगृष्णांना काकांकडे पाठवले. परंत कोणत्याही प्रकारे त्यांना दक्षिणा मागणे आवडत नव्हते. म्हणून एक दिवस ते काकांच्या घरातून पळून घरी परत आले. वडीलांनी त्यांना संगीत शिकवण्याचे कबूल कले. परंतु दुर्दैवाने दोन वर्षानंतर वडीलांचा मृत्यु झाला.

यानंतर बाळकृष्णबुवा इतर गायकांकडे शिकण्यासाठी फिरत राहिले. शेवटी ''धार'' संस्थानातील पं. देवजीबुवा यांनी त्यांना संगीत शिकवण्याचे कबूल केले. ते पं. देवजीबुवांच लाडके शिष्य झाले. पण पं. देवजीबुवांच्या पत्नीच्या छळण्यामुळे बाळकृष्णबुवा एक दिवस धारमधून निघून गेले व फिरत फिरत ग्वाल्हेरला पोहचले. तेथि हस्सूखाँचे शिष्य श्री. वासुदेवराव जोशी यांनी त्यांना गायन शिकवण्याचे कबूल केले. पण श्री. वासुदेवरावना जेव्हा बाळकृष्ण पं. देवजीबुवांकडे शिकल्याचे कळले तेव्हा त्यांनी शिकवण्याचे नाकारले. कारण वासुदेवराव व देवजीबुवांमध्ये वितुष्ट होते. निराश होऊन बाळकृष्णबुवा तेथून निघाले आणि कसे तरी बनारसला पोहोचले. तेथे एका घाटावर त्यांना वासुदेवराव जोशी दिसले. तेथे त्यांची भेट घेतल्यानंतर वासुदेवरावांचे बाळकृष्णबुवांबद्दलचे मत पालटले आणि त्यांची संगीतसाधना पुन्हा सुरु झाली. कठीण अशा गुरुसेवेनंतर बाळकृष्णबुवांना गायनातील योग्य ज्ञान मिळाले आणि त्यांचे शिक्षण पूर्ण झाले.

यानंतर गुरुआज्ञेने ते घरी परत आले व त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला. त्यानंतर ते मुंबईला आले. तेथे त्यांनी एक संगीत विद्यालय सुरु केले. सर रामकृष्ण भांडारकरांसारखे अनेक विद्वान त्यांचे शिष्य झाले. त्यांनतर त्यांना दम्याची व्याधी जडली व काही वर्षे ते या व्याधीने ग्रस्त झाले. योगायोगाने मिरज संस्थानाच्या राजाने त्यांना मिरजेस आणूनस औषधोपचाराची व्यवस्था केली आणि दरबार गायक म्हणून नोकरीही दिली. येथे त्यांनी अनेक उत्तम शिष्य तयार केले जे भारतभरात प्रसिद्ध झाले. त्यांची नावे अशी - स्व. पं. विष्णू दिगंबर पलुस्कर, गुंडूबुवा इंगळे, पं. अनंत मनोहर जोशी, पं. वामानराव चाफेकर, पं. नीळकंठबुवा, पं. जंगम इत्यादी

इत्यादीस. १८९६ इचलकरंजी संस्थानच्या राजाने त्यांना दरबार गायक म्हणून नोकरी दिली व शेवटपर्यंत ते तेथेच राहिले. येथेही त्यांनी अनेक शिष्य तयार केले. त्यामध्ये त्यांचे पुत्र पं. अण्णाबुवा, पं. मिराशीबुवा, पं. भाटेबुवा, विशेष प्रसिद्धीला आले. तारुण्यातच त्यांच्या पुत्राचे म्हणज अण्णाबुवांचे इत्यादीस. १९२५ मध्ये निधन झाले. या पुत्रवियोगातून पं. बाळकृष्णबुवा सावरले नाहीत. शेवटी ज्यांनी महाराष्ट्रात संगीताची गंगा आणली असे पं. बाळकृष्णबुवा इत्यादीस. १९२६ मध्ये इहलोक सोडून गेल.

२) खाँसाहेब अब्दुलकरीम खाँ (१९७२ - १९३७) (किराणा घराणे)

यांचे पुर्वज पानिपतजवळील किराणा गांवचे मूळ रहिवासी. त्यांचे शिक्षण वडील कालेखाँ आणि चुलते अब्दुलखाँ यांचेकडे झाले. इतर गायकांप्रमाणे त्यांनी महाराष्ट्राकडे धांव घेतली. ग्वाल्हेर, बडोदा येथे त्यांनी नाव कमावले. बडोदा संस्थानात त्यांना नोकरीही मिळाल. परंतु नोकरीत त्यांचे मन रमेना. मुंबई, मिरज व हुबळी इकडे त्यांची गाणी झाली आणि तिकडेच त्यांनी आपल्या चाहत्यांचा स्वतंत्र वर्ग निर्माण केला.

खाँसाहेबांचा आवाज पातळ, बारीक पण अत्यंत मधुर व तंबोऱ्याच्या सुरात एकजीव होईल एवढा सुरेल होता. ते ''गोबरहारी'' गायकी गात. ''गो'' म्हणजे इंद्रिय, इंद्रियांना हरण करणारी म्हणजे श्रोत्यांना आपल्याकडे खेचून घेणारी गायकी.

खाँसाहेबांची गायकी आलापप्रधान होती. स्वरांना आस देऊन, आवाजाचा चढ-उतार दाखविणे, भावदर्शक आलाप हे त्यांचे वैशिष्ट्य. तानांवर फार जोर देत नसत. त्यांना करुण रस जास्त प्रिय होता. तोडी, आसावरी, भैरवी आदी राग त्यांच्या अत्यंत आवडीचे होते. खाँसाहेब अब्दुल करीमखाँ यांच्यामुळे किराणा घराण्याची गायकी लोकप्रिय झाली.

खाँसाहेब सारंगी उत्तम वाजवीत. स्वरांचे बारीक भेद शोधून ते गळयाने दाखवण्याच्या प्रयोगात ते मग्न असत. त्यांनी देवल व क्लेमंटस यांना श्रुतीविषयक संशोधनात प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी बहुमोल सहाय्य केले.

खाँसाहेबांना वाद्य दुरुस्तीचा छंद होता. मिरजेच्या वाद्य बनविणाऱ्या कारागिरांना त्यांनी सुरेल आणि सुडौल वाद्ये बनविण्याच्या कामी बहुमोल मार्गदर्शन केले.

जनतेला संगीत शिक्षण सुलभ व्हावे म्हणून पं. पलुस्करांच्या गांधर्व महाविद्यालयाप्रमाणे ''आर्य संगीत विद्यालय'' ही संस्था काढून स्वखर्चाने होतकरु मुलांना शिक्षण दिले. त्याचप्रमाणे जाहिर जलसे करुन संगीत सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविले. महाराष्ट्रात आल्यावर त्यांनी मराठी नाटयसृष्टीतील गीते

आत्मसात केली. समाजातील सर्व स्तरातील लोकांना गायन समजले पाहिजे या दृष्टीने खाँसाहेब ख्याल, ठुमरी व नाटयगीते गाऊन लोकरंजन करत मद्रासकडील दौऱ्यात असतांना दाक्षिणात्य पद्धतीतील ''सरगम'' करण्याची पद्धत आवडली व त्यांनी हिंदूस्तानी संगीत पद्धतीत रुढ पण केली.

महाराष्ट्रात त्यांना जसे रसिक श्रोते मिळाले, त्याप्रमाणे निष्ठेने विद्यार्जन करणारे शिष्यही मिळाले. कै. रामभाऊ कुंदगोळकर (सवाई गंधर्व), कै. ग.रा. बेहरे, पं. विश्वनाथबुवा जाधव, सौ. हिराबाई बडोदेकर, कै. सुरेशबाबू माने हे शिष्य विशेष प्रसिद्धीस आले.

आपल्या गायनकलेचे नमुने त्यांनी ध्वनिमुद्रिकांतून जनतेस उपलब्ध केले आहेत. त्यांची ''पियाबीन नही आवत चैन'' ही ध्वनिमुद्रिकांतून अजरामर झाली. कोलंबिया कंपनीने प्रसिद्ध केलेल्या १८ ध्वनिमुद्रिकांतून आजही आपण त्यांचे गायन ऐकू शकतो.

(३) खाँसाहेब फैय्याजखाँ (१८८१ - १९५०) (आग्रा घराणे)

फैय्याजखाँ हे आग्रा घराण्यास प्रतिष्ठा मिळवून देणारे गायक होत. त्यांच्या वडीलांचे नावं सफरखाँ आणि आजोबांचे नांव मुहम्मदअलीखाँ (सिकंदराबाद) असे होते. त्यांची परंपरा रमजानखाँ रंगीले यांची होती. फैय्याजखाँचे बालपण आग्रामध्ये गुलामअब्बासखाँ यांच्याजवळ गेले.

संगीत शिक्षण : त्यांच्या घराण्यातच संगीत होते. त्यांनी गुलामअब्बासखाँ (आईचे वडील) यांच्याकडून संगीताची तालीम घेतली. त्यांच्यावर नथ्थनखाँ, जयपूरचे अब्दुलखाँ आणि सेनिया घराण्याचे अमीरखाँ यांच्या गायकीचा प्रभाव पडला. सुरुवातीपासूनच त्यांना धृपद-धमारची व नंतर ख्याल गायनाची तालीम मिळाली. त्यांचा आवाज सुरेख होता पण रियाझाने त्यांनी आवाज आणखी सुरेल व लोचदार तयार केला.

पुढे त्यांच्या गाण्याची कीर्ती सर्वदूर पसरु लागली आणि निरनिराळया ठिकाणी गायनासाठी बोलावले जाऊ लागले. त्यामध्ये म्हैसूर संस्थान, हैद्राबादच्या निजामाचे संस्थान, बडोदा संस्थान, इंदौर संस्थान ही संस्थाने महत्त्वाची होती. त्यांचे गायन ऐकून त्यांना अनेक सन्मान दिले गेले. आफताबे मौसीकी, संगीत चुडामणी, संगीत भास्कर, संगीत सराजे इत्यादी. बडोदा संस्थानाने त्यांना दरबार गवई म्हणून नेमले. पं. भातखंडयांनी आयोजित केलेल्या पाचही संगीत परिषदेत त्यांना गायला बोलावले होते.

गायनातील वैशिष्टये :

१) त्यांची गायकी धृपद आणि ख्याल दोन्ही गायकींचे मिश्रण होते.

२) ते धृपद, धमार, ठुमरी, ख्याल इत्यादी प्रकार गाण्यात सिद्धहस्त होतेच पण गजलगायनही उत्तम सादर करीत. बनाओ बतियाँ, बाजुबन्द खुली खुली जाय इत्यादी ठुमऱ्या आजही प्रसिद्ध आहेत. ते लयकारीत प्रविण होते. अहमजान थिरकवा त्यांना ''लयीचे बादशाह'' म्हणत असत. त्यांच्या तानेमध्ये खूपच विविधता होती.

३) ''काकू'' प्रयोगातून ते सुक्ष्म भावनांचे प्रकटीकरा प्रभावीपणे करीत. ते धृपदापूर्वीचे नोम्तोम् आलाप ढंगदारपणे पेश करीत असत. हिन्दी, ब्रज आणि ऊर्दू भाषेवर त्यांचे प्रभत्व होते. जयजयवन्ती, नटबिहाग, दरबारी, रामकली, तोडी, भैरवी हे त्यांचे आवडते राग होते.

४) त्यांनी ''प्रेमपिया'' या टोपणनावाने अनेक ढंगदार चिजांची रचना केलेली आहे.

५) संगीत प्रचार व प्रसारही त्यांनी केला. त्यांनी अनेक शिष्य तयार कले. त्यांची नावे - दिलीपचंद्र बेदी, एस.एन. रातान्जनकर, अताहुसैन, बन्दे अलीखाँ, डॉ. सुशिलकुमार चौबे, जयपूरचे गुलाम कादिर.

अशा या गुणी गायकाचे सन १९५० मध्ये निधन झाले. (आधार - संगीत मणि - भाग दोन, डॉ. महारानी शर्मा)

(४) खाँसाहेब अल्लादियाखाँ (१८५५ - १९४६) (जयपूर घराणे)

राजस्थानमधील ''उनियारा'' जिल्हयामध्ये त्यांचा जन्म एका खानदानी गायकांच्या घराण्यात झाला. ते लहानपणापासून अभ्यासात हुषार होते. अरबी आणि फारसी भाषंचा अभ्यास त्यांनी लहानपणीच पूर्ण केला. त्यांचे वडील ख्वाजा अहमदखाँ टोंकच्या राजाकडे दरबारी गायक होते. खाँसाहेब १४-१५ वर्षांचे असतांना त्यांच्या वडीलांचा मृत्यु झाल्यामुळे त्यांच्यावर तीन छोटे भाऊ आणि कुटूंबातील इतर ४-५ जणांची जबाबदारी पडली. तेव्हा त्यांचे काका जहांगीरखाँ यांनी त्यांची चिंता दूर केली आणि संगीत शिकवण्यास सुरुवात केली. पहिली ४-५ वर्षे धृपद-धमारांचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी ख्यालगायन शिकण्यास सुरुवात केली. या कालखंडात जयपूरमध्येच त्यांचे वास्तव्य होते. इथे त्यांना अनेक गायकांचा सहवास मिळाला व ते अधिक अनुभव आणि ज्ञानसंपन्न झाले. बडे महमदखाँचे पुत्र मुबारकखाँ त्यावेळी जयपूरमध्ये होते. त्यांचा प्रभाव खाँसाहेबांवर खूपच होता.

शिक्षण पुर्ण झाल्यावर एकदा त्यांनी दरबारात गायन पेश केले. त्यानंतर ते त्यांच्या भावांबबरोबर नेपाळला गेले. तेथे त्यांना दरबार गायक म्हणून नेमले. पण नेपाळची हवा न मानवल्याने ते राजस्थानला परत आले. तेथीलच एका संस्थानात त्यांना नोकरी मिळाली. पण अचानक त्यांचा आवाज बिघडला. त्यांनी अत्यंत परिश्रमपुर्वक आपला बिघडलेला आवाज सुधारण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या आवाजानुसार आपली गायन शैली तयार केली. हीच गायकी पुढे ''अल्लादियाखाँ घराण्याची'' शैली म्हणून प्रसिद्ध झाली.

यानंतर खाँसाहेब बडोद्यात आले व तेथील लोकांनीही त्यांच्या गायनाची वाखाणणी केली. यानंतर ते कोल्हापूर संस्थानात आले व तेथे त्यांची दरबार गायक म्हणून नेमणूक केली आणि शेवटपर्यंत ते कोल्हापूरातच राहिले.

अधूनमधून खाँसाहेब मुंबईस जात असत. येथेच त्यांनी पं. भास्करबुवा बुखलेंना तालीम दिली. कोल्हापूरच्या शाहूमहाराजांच्या मृत्युनंतर ते मुंबईतच आहे. येथे आल्यानंतर त्यांनी श्रीमती मोगुबाई कुर्डीकर, श्रीमती केसरबाई केरकर यांना तयार केले. त्यांचे पुत्र मंजीखाँ हे तयारीने गात, पण ते तरुणपणीच वारले. त्यांचा तिसरा मुलगा शमसुद्दीन उर्फ भूर्जीखाँ यांच्याकडे वडीलांची सर्व गायकी होती. त्यांनी बऱ्याच शिष्यांना तयार केले. त्यात पं. मल्लिकार्जुन मन्सूर हे विशेष होत. अल्लादियाखाँच्या इतर शिष्यांत शंकरराव व निवृत्तीबुवा सरनाईक, गुलुभाई जसदनवाला, वामनराव सडोलीकर हे विशेष होत. श्रीमती मोगुबाई कुर्डीकरांची मुलगी गानसरस्वती किशोर आमोणकर सध्ययाच्या काळात ही गायकी पुढे चालवीत आहेत.

संगीत जगतावर आपल्या गायकीचा ठसा उमटवून आपली खास जयपूर शैली निर्माण करणाऱ्या ''संगीतातील गौरीशंकर'' म्हणून ज्यांना नावाजले गेले अशा खाँसाहेब अल्लदियाखाँ यांचे इ.स. १९४६ मध्ये मुंबईत देहावसान झाले.

(५) श्री. महादेवबुवा गोखले (१८१६ - १९०१) (गोखले घराणे - मियाँ घराणे)

रत्नागिरी जिल्हयातील ''खोल'' गावात महादेवबुवा यांचा सन १८१६ मध्ये जन्म झाला. वयाच्या १२ व्या वर्षापर्यंत ते कोकणातच होते. पण त्यांचे आजोबांबरोबर (तातंभट गोखले) काही कारणाने भांडण झाल्याने त्यांना घरातून हाकलून दिले. त्यामुळे ते कोकणातून मिरजेस आले.

लहानपणापासून त्यांना गायनाचा नाद होता, त्यामुळे मिरजेतील गावयांकडून धृपद, धमार वगैरे पुष्कळ शिकून घेतले. पण तेवढयावर त्यांचे समाधान झाले नाही. त्याच सुमारास कुरुंदवाड येथे दक्षिण हैद्राबादचे मियाँ जैनूल अबदीनखाँ यांचे गाणे त्यांना ऐकायला मिळाले. त्याचवेळी त्यांनी या गुरुपाशीच गाणे शिकायचा निश्चय केला. त्यानुसार ते एका बैराग्याच्या मदतीने हैद्राबादला जाण्यास निघाले. त्या बैराग्याबरोबर निघून जात असता स्वारांकरवी पकडून आणून श्रीमंतांनी त्यांना (महादेवबुवांना) सांगून बघितले. पण त्यांनी ते न मानल्यामुळे श्रीमंतांनी महादेवबुवांना, त्यांचे वडील गणेशभटजी साताऱ्यास असल्याचे कळल्यावरुन, त्यांच्याकडे पोहचते केले. तेथे जैनुल अबदीनखाँचे शिय्य म्हणणारे जे बापू बुधकर (सातारा दरबारचे गवई) यांच्याकडे महादेवबुवांची वडीलांनी सोय केली. तेथे त्यांच्या वयाचेच सहअध्यायी कै. अंतुबुवा आपटे यांची साथ मिळाली.

बुधकर बुवांपाशी आपल्यांस पूर्ण विद्या मिळणार नाही हे जाणून महादेवबुवा व अंतुबुवा हे दोघे एके रात्री हैद्राबादेस जैनुल अबदीनखाँ यांच्याकडे शिकण्यासाठी सातारा सोडून निघाले. पुढे वडीलांनी या दोघांचा शोध घेतल्यावर ही दोघे त्यांना पंढरपूरात सापडली. पण त्या वयातही त्यांनी वडीलांना निग्रहाने सांगून विद्या पूर्ण शिकून झाल्याशिवाय परत येणार नाही व इतर कोणत्याही फंदात पडणार नाही. अशी शपथ घेऊन हैद्राबादला जाण्यास प्रयाण केले. या कामी त्यांना भेटलेल्या एका साधुने त्या दोघांना हैद्राबादेस सोडले व तेथील एक सन्माननीय अधिकारी पेस्तनजीभाई पारशी यांची ओळख करुन दिली. त्यामुळे तेथे त्यांच्या पोटापाण्याची व्यवस्था झाली.

नंतर जैनुल अबदीनखाँना भेटून त्यांनी गायन शिकवण्याची विनंती केली. त्यांनी आम्ही कोणाला गाणे शिकवित नाही असे सांगितले. पण य दोघांचा फार आग्रह दिसल्याने त्यांनी सांगितले की, आमच्या बरोबरीचे नऊ निरनिराळे घराणेवाले गवई दरबारात आहेत. त्या सर्वांचे गाणे ऐका आणि मग जर गाणे आमचेपाशीच शिकावयाचे असा निश्चय असेल तरच माझ्याकडे या. यानंतर या दोघांचे जैनुल अबदीनखाँकडे रीतसर शिक्षण सुरु झाले. खाँसाहेबांना पुत्र संतती नसल्याने व ही मुले निष्ठावंत असल्याने आणि त्यांची लायकी, गायकी गळयात चांगली उतरते आहे असे पाहून त्यांनी आपला हा गाण्याचाच वंश पुढे चालविणार व आपलीच मुले समजून विद्य शिकवली.

वयात आल्यावर दोघांनाही खाँसाहेबांनी महाराष्ट्रात जाऊन लग्ने करुन येण्यास सांगितले. त्यांनतर लग्न करुन आल्यावर महादेवबुवा मात्र, ''गुरुंनी आमची विद्या तुम्हाला पुरी आली, आता घरी जाणेस हरकत नाही'' असे सांगेपर्यंत हैद्राबादेसच विद्यार्जन करीत राहिले. त्यानंतर सर्व शिकून झाल्यावर ते जावयास निघाले त्यावेळी खाँसाहेबांनी हाक मारुन त्यांना सांगितले की, ''तुम विद्या बहुत पढा है, लेकीन अंधे हो, तुमको आँख देनेका है, उसवास्ते और जरा ठहरो।'' असे सांगून थांबवून घेतले. नंतर त्यांना घराण्याचे २७ स्वरांतील वाड, त्यांच्यावरील आपली मत-मतांतरे सांगितली व घराण्याचे वैशिष्टय असलेली २७ स्वरांची सामान्य योजना, षड्ज स्थानपरत्वे सुक्ष्म भेद, सामान्य भेद वगैरे सर्व सांगितले. महादेवबुवांनी सर्व टिपणे घेऊन व गळयाने व कानाने गाणे तपासून आपले मुलांस शिक्षण सुलभ करण्यासाठी व स्वरांची माहिती देण्यासाठी म्हणून प्रत्येक रागाच्या आर्या रचल्या आहेत.

यानंतर ते प्रथम महाराष्ट्रात आले व जमखंडी स्थानास नोकरीस लागले. पुढे त्यांनी ती नोकरी सोडली व नंतर देवावाचून कोणाची नोकरी करावयाची नाही असा निग्रह केला. त्यानंतर त्यांनी मुंबईस जाऊन शिकवण्या व निरनिराळया ठिकाणी जलसे करुन खून नावलौकिक संपादन केली. पुढे म्हातारपणी कोल्हापूरात देवीची नोकरी कोल्हापूर दरबाराची नोकरी या संस्थानचे कारभारी कै. माधवराव बर्वे यांनी दिली.

महादेवबुवांना चार मुले होती. त्या सगळयांना त्यांनी गुरु आज्ञेप्रमाणे गाणेच शिकवले. त्यांची गायकी अवघड असल्याने व घराण्याची परंपरा अखंडपणे चालवणारे विद्यार्थी अधिक तयार झाले नाहीत. असे असूनही २-३ विद्यार्थी चांगले तयार झाले. पण ते अकाली वारल्यामुळे मुलांपलीकडे त्यांची शिष्य परंपरा वाढली नाही.

सन १८५० च्या सुमारात महाराष्ट्रात ख्यालीची व टप्प्याची गायकी प्रथम आणण्याचे श्रेय महादेवबुवा यांनाच आहे. त्यापुर्वी महाराष्ट्रात धृपद-धमारचेच गाणे होते. त्यामुळे सध्याची महाराष्ट्रीय गायनाभिरुची निर्माण करण्याचे श्रेय ज्यांना दिले पाहिजे. अशा महादेवबुवांचे निधन वयाच्या ८५ व्या वर्षी सन १९०१ मध्ये झाले.

(६) उस्ताद बडेगुलाम अलीखाँ (१९०३ ते १९६८) (पतियाळा घराणे)

गायनाची स्वतंत्र शैली निर्माण करुन ती लोकप्रिय करणाऱ्या फार थोडया गायकांत बडे गुलाम अली यांचे नांव प्रामुख्याने घ्यावे लागेल. पतियाळा घराण्याची गायकी विशेष ढंगाने त्यांनीच पुढे आणली.

त्यांचा जन्म सन १९०३ मध्ये लाहोरमध्ये झाला. त्यांचे मुळ गांव पंजाब प्रांतातील कसून हे होय. त्यांचे वडील अलबख्क्षआणि चुलते कालेखाँ हे उभयता प्रसिद्ध गायक होते. बडे गुलाम अलीवर कालेखाँचे फार प्रेम होते. त्यांनीच लहानपणापासून त्यांना संगीत शिक्षण दिले. वयाच्या २० व्या वर्षी त्यांच्यावर कुटूंबाच्या पोषणाची जबाबदारी पडली. म्हणून ते सारंगीवादन करुन चरितार्थ चालवीत असत. तरी पण त्यांचा गाण्याचा रियाझ चालूह होता.

१९४४ साली मुंबईत झालेल्या ''विक्रम संगीत परिषदेत'' त्यांचा गायक म्हणून प्रथम परिचय झाला. १९४९ साली ते मुंबईस कायम वास्तव्यासाठी आले. त्यांचा आवाज अत्यंत सुरेल, मुलायम, मंद्रपासून तार सप्तकापर्यंत सहज फिरत असे. दाणेदार ताना आणि गायगीत पंजाबी ढंगाचे मिश्रण यामुळे त्यांचे गायन नाविन्यपुर्ण वाटे. ''सरगम'' करण्याची त्यांनी एक खास शैली बनविली होती. याशिवाय ते उत्तम ठुमरीही सादर करीत. त्यामुळे यांच्या गायनाचा सर्वत्र बोलबाला होऊन ते अखिल भारती कीर्तीचे गायक बनले आणि त्यांना अफाट चाहता वर्ग लाभला.

कुठलाही राग गातांना त्यांच्या मनात त्या रागाची काही कल्पना नेहमी घोळत असे. त्यांचे गायन ऐकतांना ते काही तरी मनातले सांगतात असे वाटे. त्यामुळे त्यांच्या गाण्यांचे लोकांना फार आकर्षण वाटे व त्यांच्या मनाची पकड घेई.बडे गुलाम अलींनी ''सबरंग'' या नावाने अनेक चिजा रचल्या आहे. त्या सर्वच आकर्षक मुखडयाच्या आणि गोड बांधणीच्या असल्याने अनेक लोक त्या चिजा गाऊ लागले. त्यांनी आपली कला अनेक ध्वनिमुद्रिकांतून जनतेला उपलब्ध करुन ठेवली आहे. ''याद पिया की आये'' ही ठुमी तर रसिकांच्या मनात आजही रेंगाळत आहे. ते मूळचे पंजाबचे (पाकिस्तानातील) पण त्यांनी भारतीय नागरिकत्व पत्करले. पद्मभूषण ही पदवी देऊन भारत सरकारने त्यांचा बहुमान केला आहे. बडे गुलाम अलींची गायकी आत्मसात करणे अवघड आहे. ती त्यांची अशी स्वतंत्र गायकी होती. त्यामुळे त्यांची शिष्यशाखा अगदीच मर्यादित आहे.

भारतीय संगीतात स्वत:चे स्थान निर्माण करणारा एक प्रख्यात असा हा गायक १९६८ साली हैद्राबाद येथे कालवश झाला.

(७) गानतपस्विनी पं. अंजनीबाई मालपेकर (१८८३ - १९७४) (भेंडीबाजार घराणे)

स्वरांची निरंतर उपासना, संगीताची प्रदीर्घ खडतर तपश्चर्या, गुरंवरची अतीव श्रद्धा, दृढ संकल्प आणि अनेक प्रकारच्या मोठमोठया संकटांना धैर्याने तोंड देऊन आपल भेंडीबाजार घराण्याची वैशिष्टयपुर्ण गायकी ज्यांनी देशभरात यशस्वीपणे पोहोचवली व तिला मान मिळवून दिला त्या अलौकिक गायिका म्हणजे गानतपस्विनी पं. अंजनीबाई मालपेकर.

या थोर गायिकेचा जन्म २२ एप्रिल, १८८३ रोजी गोव्यातील ''मालपे'' या गावी एका संगीतोपासक कुटूंबात झाला. त्यांच्या आई नबूबाई या उत्तम गायिका होत्या. तसेच आईच्या आई गुजाबाई या संगीताबरोबरच संस्कतच्याही उत्तम जाणकार होत्या. वडीलांनाही संगीताची चांगली जाण होती. मामा वामनराव हे तबला व पखवाज वादानात निष्णात होते.

कालांतराने हे कुटूंब मुंबईला स्थायिक झाले. कुटूंबात संगीताची पंरपरा असल्याने शालेय शिक्षणाबरोबरच सगीताचेही शिक्षण घरी दिले जात असे. परंतु शास्त्रीय संगीतामध्ये पारंगत होण्यासाठी अंजनीबाईंना एखाद्या मोठया गुरुकडे पाठवणे आवश्यक आहे हे त्यांचे आई-वडील जाणून होते. त्याकाळी मुंबईत अनेक उत्तम गवई होते. पण त्या सर्वांमध्ये अत्यंत मान्यवर आणि स्वतःच्या आगळयावेगळया गायकीने व ज्ञानाने स्वतःचे विशेष स्थान निर्माण केलेले भेंडीबाजार घराण्याचे उस्ताद नजीरखाँसाहेब गुरु लाभावेत अशी त्यांच्या वडीलांची तीव्र इच्छा होती. ही इच्छा पं. भातखंडे यांच शिफारशीमुळे प्रत्यक्षात आली.

आपल्या शास्त्रीय संगीताच्या परंपरेमध्ये ''गंडाबंधन'' या विधीला अत्यंत महत्त्व आहे. अंजनीबाईचा गंडाबंधन समारंभासाठी उस्ताद नजीखाँ व त्यांचे दोघे गायक बंधू उस्ताद छज्जूखाँ व उस्ताद खादिमहुसेनखाँ, त्यांचा शिष्य परिवार, पं. भातखंडे आणि इतर मान्यवर गायक उपस्थित होते.

लगेच दुसऱ्या दिवशी पहाटेपासून त्यांची तालीम सुरु झाली. भेंडीबाजारवाले हे गायक बंधू संगीताला फक्त मनोरंजनाचे साधन न मानता ईश्वराच्या आराधनेचा एक मार्ग मानत. या नादोपासनेसाठी आवाज फक्त सुरेल व जव्हरीदार असून चालत नाही तर त्यात प्राण असावा लागतो जो श्वास आणि मन यांच्या सहाय्याने येतो. त्यामुळे ते याचप्रकारची स्वरसाधना आणि उपासना शिकवित होते.

खंडमेराचे तत्व समजावूर सांगून ते त्यांनी २, ४, ५, ६, ७ अशा स्वर समूहांचे मुळ ४०-५० प्रकार पाठ करुन घेतले होते. फक्त यमन रागातच बालआलाप, गमक तान, मठ्ठीतान, सुक्ष्मस्वरकरण, या रागातील विशेष स्वरसंगती या सर्व गानक्रिया त्यांनी शिकविल्या त्यामुळे फक्त यमन रागाचीच तालीम साडेतीन वर्षे चालली होती. त्यानंतर दीड वर्षे भैरवीची तालीम याचप्रकारे दिली. अशा तऱ्हेने शुद्ध, तीव्र, कोमल स्वरांची पूर्ण तालीम दिल्याने त्यांचे पुढील शिक्षण सुकर झाले.

शास्त्रीय संगीताबरोबरच ठुमरी, दादरा, गजल, भजन इत्यादी गायन प्रकारही त्या उत्तम गात. अंजनीबाईंनी संगीतशास्त्राचाही सखोल अभ्यास केला. त्यांचे गुरु आणि पं. भातखंडे यांच्यातील अनेक संगीत विषयावरील चर्चा त्या लक्षपूर्वक ऐकत असत आणि आपल्या शंकाही विचारत असत. त्या बंदिशींचे नोटेशन करण्यातही फारच निष्णात होत्या. अत्यंत परिणामकारक स्वर लगाव, १।। मिनिटांचा श्वास, एका श्वासात ख्यालाची स्थायी मांडणे, गुंजनयुक्त दीर्घ मींड, गमकेचा दाणेदार ताना, खंडमेराचा कलात्मक उपयोग, बंदिशींचे सौंदर्यपूर्ण प्रस्तुतीकरण त्या करु शकतील असा विश्वास जेव्हा उस्ताद नजीरखाँना वाटला तेव्हा त्यांनी १६ वर्षाच्या या पट्टशिष्येची पहिली मैफल मुंबईत आयोजित केली. तेव्हा या नवोदित कलासाधिकेने आपल्या दमदार व आलौकिक गायनाने सर्व श्रोत्यांना मंत्रमुग्ध्य करुन टाकले. या कार्यक्रमानंतर ''अंजनीबाई मालपेकर'' हे नाव संगीतक्षेत्रात सर्वत्र गाजू लागले.

१९०४ साली झालेल्या एक कार्यक्रमानंतर त्यांचा आवाज पूर्णपणे बसला. सर्व प्राकरचे उपचार करुनही काहीच फायदा होत नव्हता. इतक्या वर्षांची तपश्चर्या धुळीला मिळाली असेच वाटत होते. त्यांच्या काही हितचिंतकांनी ''केडगांव'' येथील सिद्ध पुरुष श्री. नारायण महाराजांच्याकडे जाण्याचा सल्ला दिला. पण अंजनीबाईंच्या अशा गोष्टींवर विश्वास नव्हता म्हणून त्यांनी हा सल्ला मानला नाही. मात्र त्यांचे मामा श्री. विनायकराव स्वतः नारायण महाराजांकडे गेले व त्यांना सर्व परिस्थिती सांगितली. महाराजांनी त्यांना लवंग-खडीसाखरेचा प्रसाद देऊन, ''आवाज नक्की पूर्ववत होईल'' असे सांगितले. त्यानंतर अंजनीबाईंनी या गोष्टींवर विश्वास नसतांना सुद्धा मामांचे मन राखण्यासाठी तो प्रसाद खाल्ला आणि त्यांचा आवाज पहिल्यासारखा बुलंद व सुरेल झाला. त्यानंतर त्यांचे सांगीतिक, कौटुंबिक आणि आध्यात्मिक तीनही पातळयांवर जीवन सुखसमृद्धीने भरुन गेले.

१९२० साली उस्ताद नजीरखाँचे निधन झाल्यावर त्यांनी फक्त नारायण महाराजांची सेवा करण्याचे ठरविले. महाराजांच्या आध्यात्मिक प्रभावाने कीर्ती आणि संपत्ती याबद्दल एक प्रकारची उदास नता मनात उद्भवू लागली व लोकांसाठी गाण्यापेक्षा ईश्वरासाठी गाऊन नादोपासना करावी असे त्यांना वाटू लागले. १९२३ साली नारायण महाराजांच्या उपदेशानुसार आपल्या कलेच्या कीर्ती शिखरावर असूनही मैफलीत गाणे बंद करुन संन्यस्त राहण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्याआधी त्यांनी त्यांच्या अगणिक रसिक श्रोत्यांच्या आग्रहाखातर मुंबईच्या टाऊनहॉलमध्ये आपली अखेरची मैफल सादर केली.

मैफलीत गाणे बंद केले तरी संगीत त्यांच्या रोमारोमात भरलेले होते. त्यांच्या अद्वितीय गायनाचा थोडा तरी प्रसाद मिळण्यासाठी जे गायक त्यांच्याकडे येत त्यांना त्या मोकळया मनाने शिकवित आणि गाण्यातले मर्मही समजावून सांगत. त्यामुळे त्यांच्या शिष्यांना एक नवी दृष्टी, मार्ग मिळत असे. म्हणून त्यांच्या शिष्यसंप्रदायात अनेक नामवंत कलाकार आहेत. त्यामध्ये पं. कुमारगंधर्व, गानसरस्वती किशोरी आमोणकर, पं. त्र्यंबकराव जानोरीकर, श्रीमती नैनादेवी, बेगम अख्तर यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. अंजनीबाईंनी केलेल्या अद्वितीय गानसेवेचा गौरव म्हणून १९८५ मध्ये राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते ''फेलो ऑफ द संगीत अकादमी'' या पुरस्काराने सन्मानित केले.

ईश्वरचिंतन आणि नादोपासना यामध्ये मग्न असलेल्या अंजनीबाई उस्ताद नजीरखाँच्या आठवणीने सद्गदीत होत. आपल्या गुरुंविषयी आणि संगीतसाधनेविषयी त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे, ''संगीत तर अगाध नादसागर आहे त्यात नेहमीच काहीतरी शिकण्यासारखे असते. आज माझे गुरु जर हयात असते तर माझ्या अठ्ठयात्तराव्या वर्षीसुद्धा मी त्यांच्याकडून संगीत शिकतच राहिले असते. संगीताचा अर्थ आहे तपश्चर्या! तपश्चर्या म्हणजे तपश्चर्याच! या दरम्यान दुःखाचे भानच रहायला नको. आपण जर एकचित्त होणार नसू तर ते संगीतच नाही.'' संगीत साधनेबद्दल एवढी उच्च विचारसरणी प्रत्यक्ष अनुसरणारी ही गानतपस्विनी ७ ऑगस्ट, १९७४ रोजी नादब्रम्हात विलिन झाली.

(८) संगीत - मार्तंड पं. जसराज (मेवाती घराणे)

संगीत - मार्तंड पं. जसराज आजच्या संगीत कलाकारांमधील एक पारंपारीक संगीत-साधकांबरोबरच आध्यात्मिक गायकाच्या रुपाने प्रसिद्ध आहेत. आजच्या गायक कलाकारांत ते उच्च स्थानावर आहेत. सूर आणि लय यांचे मोहक मिश्रण हे त्यांच्या गायनाचे वैशिष्टय आहे. आध्यात्मिक रसाच्या आनंदानुभूतीचा प्रत्यय त्यांच्या भजन गायनातून मिळतो.

पं. जसराज हे मेवाती घराण्याचे प्रतिनिधी गायक आहेत. त्यांचा जन्म २० जानेवारी, १९३० मध्ये हिसार जिल्हयात झाल. त्यांच्या घरातील वातावरणच संगीतमय होते. त्यांचे वडील पं. मोतीराम त्यावेळी काश्मिर राज्याचे दरबार गवई होते आणि त्यांचे मोठे बंधू पं. मणिराम हे सुद्धा सुविद्या कलाकार होते. पं. जसराजांना त्यांच्या वडीलांकडून व मोठया भावाकडून संगीताची तालीम मिळाली. त्यांनी सुरुवातीला तबलावादनाचे सुद्धा शिक्षण घेतले होते. तरी पण त्यांची ओढ गायनाकडे होती. त्यामुळेच ते गायन क्षेत्रातील आघाडीचे कलाकार बनले. त्यांचा पहिला कार्यक्रम १९५२ साली नेपाळच्या दरबारात झाला.

पं. जसराज हे ''हवेली संगीतात'' सुद्धा निष्णात आहेत. या प्रकारच्या संगीताची तालीम त्यांनी बाबा श्याम मनोहर गोस्वामी यांच्याकडून मिळाली. गायनात प्रविण झाल्यानंतर पं. जसराज आणि त्यांचे मोठे बंधू पं. मणिराम यांनी जुगलबंदीचे कार्यक्रम करण्यास सुरुवात केली. या प्रकारच्या गायनाने त्यांना

खूप प्रसिद्धी मिळाली. ही जुगलबंदी एक नवीन ढंगातील होती. ही प्राचीन मूर्च्छना पद्धतीवर आधारीत होती. या प्रकारच्या गायनात एकाच वेळी निरनिरळया रागांचा आणि सरगमचा प्रयोग केला जातो. लोकांनी त्यांच्या या जुगलबंदी कार्यक्रमाला ''जसरंगी जुगलबंदी'' असे नांव दिले.

पं. जसराज जरी मेवाती घराण्याचे प्रमुख गायक असले तरी त्यांनी सर्व घराण्यांच्या वैशिष्टयांना आपल्या गायनात स्थान दिले आहे. मुंबईतील स्वामी हरिदास संगीत संमेलनातील गायनाने त्यांना प्रसिद्धी मिळाली आणि शेवटी ते १९६३ पासून मुंबईत वास्तव्यासाठी आले. त्यांच्या गायनात स्थायी, अंतरा, संचारी आणि आभोग या चारही अंगाचा ते प्रयोग करतात. याशिवाय त्यांच्या ख्याल गायनात बंदिशींमध्ये काव्याचा प्रयोग हे एक अनोखे उदाहरण आहे.

संगीताचा प्रचार आणि प्रसार करतांना त्यांनी देशात अनेक शिष्य तर तयार केलेच आहेत पण परदेशातही अनेक ठिकाणी संगीत संस्था सुरु केल्या आहेत. व्हँकुवरमध्ये ''पंडित जसराज स्कूल ऑफ म्युझिक, न्युजर्सी, अमेरीका'' येथे भारतीय संगीताची एक नवी पिढी ते तयार करीत आहेत. याशिवाय कॅनडातील टोरँटो विश्वविद्यालयात भारतीय संगीताचा अभ्यास करण्यासाठी पंडितजींनी त्यांच्या नावाने शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात केली आहे. ते एक असे पहिले भारतीय आहेत की ज्यांना एखाद्या परदेशी विश्वविद्यालयात स्वतःच्या नावाने शिष्यवृत्ती देण्याचा मान मिळाला आहे.

पं. जसराजांच्या संगीत, संस्कृती आणि साहित्याच्या संबंधित अनेक कॅसेटस् निघाल्या आहेत. अनेक प्रकारचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. पद्मभूषण, राजकीय महाविद्यालयाकडून सुरेर गुरु सन्मान (प. बंगाल), वाराणसीच्या जनतेने दिलेला कलासम्राट पुरस्कार, दिनानाथ मंगेशकर पुरस्कार, रसराज पुरस्कार, संगीत कलारत्न पुरस्कार, अल्लाउद्दीन संगीत रत्न पुरस्कार, राजीव गांधी पुरस्कार, जायन्टस् इंटरनॅशनल पुरस्कार इत्यादी.

संगीतात एक सफल कलाकार असून सुद्धा त्यांचा स्वभाव अतिशय मधुर आणि विनम्र आहे. त्यांनी मेवाती घराण्याचा वारसा चालविण्यासाठी मुक्त हस्ताने विद्यादान करुन अनेक शिष्य तयार केले आहेत. त्यामध्ये पं. संजीव अभ्यंकर हे आजच्या युवा पिढीतील एक प्रमुख नांव आहे.

रागबोध - प्रो. बी.आर. देवधर
संगीतशास्त्र - डॉ. वसंतराव राजोपाध्ये
गोखले घराने की गायकी : प्रो. माधवराव गोखले
संगीतशास्त्र - डॉ. वसंतराव राजोपाध्ये
गानतपस्विनी पं. अंजनीबाई मालपेकर - लेखिका - डॉ. सुहासिनी कोरटकर - हा लेख संगीत कला विहार मासिकाच्या मे, २०१३ च्या अंकामधून साभार
पंडित जसराज, गायक मेवाती घराना - संगीत मणी - भाग २, या डॉ. महारानी शर्मा यांच्या पुस्तकातून)